क्र.२/नसवि/महासभा/ ०१ /२०१०-२०११
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :- ०९ एप्रिल २०१०

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महानगरपालिका सभा क्रमांक - ०१ /२०१०-२०११

महानगरपालिका सभेची नोटीस

प्रति,
मा. ----------
सदस्य/सदस्या,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिका सभेचे कामकाज मधील खंड १ (ए) (एच) (आय) मध्ये केलेल्या तरतुदी नुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **शनिवार दिनांक १७/०४/२०१० रोजी सकाळी ११.३० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील सभागृह मुख्यालय,सांगली** येथे आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस आपण उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

9.4.2010
प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

O/C
२६

परिशिष्ठ

१. मागील म्हणजे सर्वसाधारण सभा दिनांक २०/०३/२०१० च्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

सन्माननीय सदस्यांकडून दाखल होणारे -
अ) दु:खवठ्याचे ठराव.
ब) अभिनंदनाचे ठराव.

३. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४४ नुसार सन्माननीय सदस्यांकडून आलेल्या प्रश्नांची उत्तरे.

४. महानगरपालिकेच्या वैद्यकिय केंद्राकडे दैनंदिन येणाऱ्या रुग्णांना जरुरीनुसार मानद डॉक्टरांचे कडून तपासून औषधोपचार केले जातात. यासाठी एकूण ४५ डॉक्टरांची नियुक्ती करणेत आली असून, त्यांना मासिक रु.१००/- याप्रमाणे मानधन दिले जाते. सद्या १६ मानद डॉक्टर वेळोवेळी येवून रुग्णांना सेवा देत आहेत. सदर ४५ डॉक्टरांचे कडून मानद सेवा घेवून रुग्णांना मानसेवी तज्ञाकडून सल्ला मिळणेकामी उपयुक्त असलेने, सदर मानसेवी डॉक्टरांना प्रतिमहा रु.१००/- ऐवजी र.रु.५००/- मात्र मानधन देणेस मान्यता मिळणेकमी **उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.१७/०३/२०१० चे विषयपत्र.**

५. UIDSSMT या योजनेंतर्गत (वारणा नदी उद्‌भव) वाढीव व सुधार सांगली कुपवाड नळ पाणी पुरवठा योजनेंतर्गत मुळ प्रस्तावाप्रमाणे कुपवाड येथे २१ एम एल डी आणि हिराबाग जलशुद्धीकरण केंद्र येथील २२ एम एल डी ची स्वतंत्ररित्या संप व पंप प्रस्तावित करणेत आले होते. सदरची दोन्ही जलशुद्धीकरण केंद्रे एकत्रीतरित्या एकूण ४३ डी एम एल डी ची माळ बंगला येथे बांधणेकामी सदरच्या बदलास मान्यता मिळणेकामी **उपायुक्त (पाणी पुरवठा विभाग) यांचे दि.१९/०३/२०१० चे विषयपत्र.**

मा.उपसंचालक नगररचना पूणे विभाग पूणे यांचेकडील पत्र क्र.पूणे विभाग/वि.नि.नि./फेरबदल/कलम ३७(१अे अे /सि.कं.रेग्युलेशन/मनपा/प्राधिकरण/उसंपुवि/३८५दि.२६/०२/२०१०) अन्वये मानव निर्मित धोक्यापासून इमारतीची सुरक्षा व संरक्षण करणेच्या दृष्टीने उपाययोजना नमुद केल्या आहेत. त्यानुसार बाधकाम परवाना मंजूरीसाठी सादर केलेल्या नकाशावर धोक्याची सुचना उपस्थित नागरीकांचे पर्यत पोहचविणेसाठी इलेक्ट्रीक सिस्टीमचा उपयोग करणे, बाहेर पडणेसाठी बाह्य मार्ग बंधनकारक करणे, अंतर्गत रस्ते इत्यादी बाबींचा विकास नियंत्रण नियमावली मध्ये समाविष्ठ करणेस तसेच, याकामी शासन स्तरावर निर्णय होणेसाठी मान्यता मिळणेकामी **उपायुक्त (सहा.संचालक नगररचना) यांचे दि.२०/०३/२०१० चे विषयपत्र.**

महानगरपालिकेच्या सांगली येथील स.नं.३५८ व ३७१ मधील जमीन १०० फुट विकास योजनेतील रस्त्यासाठी मे.विशेष भूमी संपादन अधिकारी क्र.०६ यांचे मार्फत संपादन करणेत आले होते. सदरची जमीन न्यु.विजय इंडस्ट्रीज, सांगली यांचे तर्फे श्री.आण्णा श्रीगोंडा पाटील व श्री.आण्णासो उपाध्ये इतर यांचेकडून उक्त कार्यालयाकडून ०.५३ आर क्षेत्र संपादन करुन घेवून संपादनापोटी नुकसान भरपाईची र.रु.१२,५४,१२६.६० मात्र जमीन मालक यांना दि.१२/१२/१९९४ रोजी आदा करणेत आली आहे. सदरची नुकसान भरपाईची रक्कम चालू बाजार भावाने मिळाली नाही म्हणून जमीन मालक यांनी सांगली येथील न्यायालयात भूसंपादन केस नं.२८/१९९५ अन्वये दावा दाखल केला होता. सदर दाव्याचा निकाल होवून न्यायालयाने र.रु.२८,९२,१४७.२८ व त्यावरील ९% व्याज दराने होणारी रक्कम प्रतिवादी यांना देणेबाबत ओदश केले होते. याकामी महानगरपालिकेने उच्च न्यायालयात अपिल दाखल करणेत आलेले आहे. अपीलाच्या अनुषंगाने मे.उच्च न्यायालयामध्ये जिल्हा न्यायालयाने दिलेला आदेश कायम ठेवून दाव्याची र.रु.२८,९२,१४७.४०व त्यावरील दि.२५/०७/१९९५ पासून ९% व्याजाने होणारी र.रु.३७,३०,८६९/- असे एकूण अंडर प्रोटेस्ट र.रु.६६,२३,०१६/- मात्र न्यायालयात भरण्याचे आदेश दिलेले आहेत. तथापि, सदरची रक्कम एकरक्कमी भरणे महापालिकेस शक्य नसल्याने,मे.उच्च न्यायालयास विनंती केलेनुसार दि.२०/०१/२०१० चे निर्णयानुसार पहिला हप्ता रु.११,२४,६०४/- मात्रचा तातडीने जमा करणेकामी मा.आयुक्तसो यांनी मान्यता दिली आहे. त्यास महासभेची कार्योत्तर मान्यता मिळणेस, तसेच या पुढील उर्वरित रक्कम प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यत मे.उच्च न्यायालयात जमा करणेकामी धोरणात्मक मान्यता मिळणेकामी **सहा.संचालक नगररचना यांचे दि.२५/०२/२०१० चे विषयपत्र.**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदीनुसार कलम २०(३) अन्वये नियुक्त करणेत आलेले स्थायी समिती सदस्यापैकी कलम २३ अन्वये रिक्त झालेली स्थायी समिती सदस्यांची जागा महाराष्ट्र शासन असाधारण राजपत्र दि.२७ फेब्रुवारी २००७ अन्वये सुधारीत कलम ३१अ मधील तरतुदीनुसार तौलनिक संख्याबळानुसार भरणे व त्यास मान्यता देणे.

शासकीय पत्रव्यवहार अवलोकनी घेणे.

मा.महापौर, यांचे संमत्तीने दाखल होणाऱ्या ऐनवेळच्या विषयांना मान्यता देणे.

9.4.2010

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

मा.महापौर, यांचे मान्यतेने वितरीत

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- १७/०४/२०१०

ठराव क्रमांक :- ०४

विषय क्रमांक :- ०४

सोबतचे उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.१७/०३/२०१० चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिकेच्या वैद्यकीय केंद्राकडे दैनंदिन येणाऱ्या रुग्णांना जरुरीनुसार मानद डॉक्टरांचेकडून तपासणी करुन, औषधोपचार केले जातात. यासाठी महापालिकेच्या एकूण १० वैद्यकिय केंद्राकडे ४७ मानद डॉक्टरांची नेमणूक करणेत आली होती. सदर डॉक्टरांना प्रतिमहा र.रु.१००/- मात्र मानधन दिले जाते. सदर मानद डॉक्टरांनी मानधन वाढवून मिळावे अशी मागणी केली आहे. त्यानुसार सदर डॉक्टरांना मानधन वाढवून दिल्यास सदरचे डॉक्टर मानसेवी सेवा देतील अशी शक्यता आहे. त्यामुळे नागरीकांना तज्ञ डॉक्टरांचा सल्ला व मार्गदर्शन मिळावे यासाठी त्यांचे मानधनात वाढ करणे उचित होईल.यासाठी मासिक र.रु.५००/- मात्र देणेस मान्यता मिळणेकामी विषयांकीत प्रस्ताव सादर करणेत आला आहे. त्याशी ही सभा सहमती दर्शवित आहे.

महानगरपालिकेच्या वैद्यकीय केंद्राकडे दैनंदिन येणाऱ्या रुग्णांना तज्ञ डॉक्टरांचा सल्ला व मार्गदर्शन व्हावे यासाठी यापूर्वी नियुक्ती केलेल्या ४७ पैकी ४५ मानद डॉक्टर्सना प्रतिमहा रु.५००/- याप्रमाणे मानधन आदा करणेस व त्याकामी प्रतिमहा र.रु.२२,५००/- मात्रचे खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे. तसेच, महापालिका क्षेत्रातील नागरीकांना जास्तीत जास्त लाभ होणेच्या दृष्टीने सदर मानद डॉक्टर्सना प्रत्येक आठवड्याचा एक दिवस नेमूण देणेत यावा. सदर दिवशी संबंधित डॉक्टर्सना उपस्थित राहून महिन्यातून किमान ५ वेळा मानसेवी सेवा देणे बंधनकारक करणेत येवून, जे मानद डॉक्टर अशी सेवा वेळेवर नियमितीपणे देणार नाहीत अशा डॉक्टरांची सेवा तात्काळ संपूष्टात येईल अशी अट नूमद करणेत यावी अशी ही सभा सूचित करीत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

वैद्यकीय आरोग्याधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- १७/०४/२०१०

ठराव क्रमांक :- ०५

विषय क्रमांक :- ०५

सोबतचे उपायुक्त (पाणी पुरवठा) यांचे दि.१९/०३/२०१० चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सुजल व निर्मल अभियानांतर्गत सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेने पाणी पुरवठा योजनांचे सक्षमीकरण करणेसाठी अंदाजपत्रके व आराखडे तयार करणेसाठी तांत्रिक सल्लागार नेमले असून, त्यांनी UIDSSMT अंतर्गत प्रस्तावित कामे याबाबतचा संयुक्तीक अभ्यास करुन, अहवाल सादर केलेनुसार UIDSSMT अंतर्गत असलेली जलशुद्धीकरण केंद्रे एकत्रीतरित्या बांधणेचे सूचित केले आहे. त्यामुळे महापालिका प्रकल्प खर्चात आर्थिक बचत होणार आहे.

सबब, UIDSSMT अंतर्गत मुळ प्रस्तावाप्रमाणे प्रस्तावित असलेली जलशुद्धीकरण केंद्रे कुपवाड येथील २१ एम एल डी आणि हिराबाग जलशुद्धीकरण केंद्रे येथील २२ एम एल डी स्वतंत्ररित्या प्रस्तावित असलेली जलशुद्धीकरण केंद्रे एकूण ४३एम एल डी ची माळबंगला येथे बांधणेबाबत बदल करणेस विषयांकीत प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करणेत आला होता. तथापि, प्रस्तुत विषयी प्राप्त झालेल्या उपसूचनेनुसार वारणा नदी उद्भव या योजनेंतर्गत वाढीव व सुधार सांगली कुपवाड नळ पाणी पुरवठा योजनेंतर्गत मुळ प्रस्तावाप्रमाणे कुपवाड आणि हिराबाग जलशुद्धीकरण केंद्र येथे स्वतंत्ररित्या संप व पंप प्रस्तावित करण्यात आले होते. सदरची दोन्ही जलशुद्धीकरण केंद्रे एकत्रितरित्या एकूण ७० एम.एल.डी.ची माळबंगला येथे बांधणे या बदलास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- महापौर,

कार्यकारी अभियंता

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- १७/०४/२०१०

ठराव क्रमांक :- ०६

विषय क्रमांक :- ०६

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.२०/०३/२०१० चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

मा.उपसंचालक, नगररचना पुणे विभाग पुणे यांनी शासनाच्या नगररचना विकास विभागाकडील दि.२७/०२/२००९ रोजीच्या नोटीसीनुसार मानव निर्मित धोक्यापासून इमारतींची सुरक्षा व संरक्षण करणेकरीता विकास नियंत्रण विशेष नियमावली करणेबाबत दैनिक वृत्तपत्रात प्रसिद्धीस देवून सूचना व हरकती मागविणेत आल्या होत्या. याकामी मा.उपसंचालक, नगररचना पुणे विभाग पुणे यांचेकडे प्राप्त झालेल्या १७ सूचना व हरकतींच्या प्रति इकडे पाठविणेत आल्या असून, याकामी महापालिकेच्या सर्वसाधारण सभेचा निर्णय व अभिप्राय मागविणेत आले आहेत.

प्रस्तुत कामी श्री.व्ही.एम.मिरानी,माजी सचिव,सार्व.बांधकाम विभाग यांचे अध्यक्षते खाली विशेष समितीचे गठण करणेत आले असून, सदर समितीने मानव निर्मित धोक्यापासून इमारतींचे सुरक्षा व संरक्षण करणेच्या दृष्टीने करावयाच्या उपाययोजना नमुद केल्या आहेत. त्यानुसार प्रामुख्याने शासकीय इमारती, असेंम्ब्ली इमारती,शासकीय/निमशासकीय संस्था, कोर्ट इमारती, प्रिझन्स् रजि.ट्रस्टच्या इमारती,हॉस्पिटल्स्, शाळा, कॉलेजेस्, शॉपिंग मॉल्स् मार्केटस्, धार्मिक स्थळे, इंटरनॅशनल हॉटेल्स् पर्यटन व ऐतिहासिक स्थळे,स्टॉक एक्सेजेस, व्यापारी इमारती इत्यादी गर्दी व वर्दळ असणाऱ्या ठिकाणी होवू शकतो. यासाठी समितीने सूचित केलेनुसार अशा बांधकाम परवानगी पूर्वी ओपन स्पेस,फ्रंट मार्जिन,साईड मार्जिन,रस्ता रुंदी,कंट्रोल सिक्युरिटी, आऊट पोष्ट इत्यादी बाबी मंजूरीसाठी सादर केलेल्या बांधकाम नकाशावर दर्शविणे आवश्यक असल्याचे नमुद केले आहे. तसेच धोक्याचे वेळी इमारती मधून बाहेर पडणेसाठी तसेच धोक्याची सूचना लवकरात लवकर नागरिक व उपस्थित लोकापर्यत जाणेस आधुनिक इलेक्ट्रॉनिक्स् व इलेक्ट्रिकल्स् सिस्टीमचा उपयोग करणे योग्य आहे. अशा धोक्याच्या वेळी बाहेर पडणेस विशेष बाह्य मार्ग बंधनकारक करणे. समितीने सूचित केलेल्या सूचना योग्य असलेने, सदरच्या सूचना विकास नियंत्रण नियमावली मध्ये समाविष्ठ करणेस मा.उपसंचालक, नगररचना पुणे विभाग पुणे यांचेकडे प्रस्ताव सादर करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

नगररचनाकार

तसेच प्रस्तुत विषयी प्राप्त १७ सूचना व हरकती कामी शासन स्तरावर निर्णय होणे योग्य

होईल असे या सभेचे स्पष्ट मत आहे.

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- १७/०४/२०१०

ठराव क्रमांक :- ०७

विषय क्रमांक :- ०७

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.२५/०२/२०१० चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली येथील स.नं.३५८ व ३७१ या जमिनी मधील १०० फुटी विकास योजनेतील ०.५३ आर क्षेत्र जागा मे.विशेष भूमी संपादन अधिकारी क्र.०६ यांचे मार्फत सदरची जमिन न्यु विजय इंडस्ट्रिज, सांगली यांचे तर्फे श्री.आण्णा शिरगोंडा पाटील व श्री.आण्णासो के. उपाध्ये व इतर यांचेकडून संपादन करणेत आली होती.संपादनापोटी होणारी नुकसान भरपाई र.रु.१२,५४,१२६.६० मात्र जमिन मालक यांना आदा करणेत आलेली आहे.

नुकसान भरपाई चालू बाजारभावाने मिळाली नाही म्हणून जमिन मालक यांनी सांगली येथील न्यायालयात भूसंपादन केस नं.२८/१९९५ अन्वये दावा दाखल केला होता. सदर दाव्याचा निकाल दि.३०/०६/२००७ रोजी होवून मे.न्यायालयाने र.रु.२८,९२,१४७.२८आणि त्यावरील दि.२५/०७/१९९५ पासून ९% दराने व्याजाची होणारी रक्कम जमिन मालक तथा प्रतिवादी यांना देणेबाबत आदेश केले होते. याकामी दि.०७/०५/२००८ रोजी मे.उच्च न्यायालयात ॲफिडेव्हीट (प्रतिज्ञापत्र) दाखल करणेत आले आहे.

प्रथम अपीलाच्या सुनावणी वेळी सदर दाव्यासंबंधी अंदाजे र.रु.६६,२३,०१६/- इतकी भरावी लागते ही बाब मे.न्यायालयाच्या निर्दशनास आणून दिले असता त्यावेळी प्रतिवादी /जमीनमालक यांनी मूळ संपादनाची रक्कम वजा जाता उर्वरित रक्कमेचा टीडीआर ज्यावेळी मंजूर होईल तो त्यावेळी घेणेस तयार आहे असे चर्चेअंती सूचित करणेत आले. तथापि, मा.शासनाचे नगर विकास विभागाकडील दि.०३/०२/२००७ चे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १५४ च्या निर्देशानुसार टीडीआर बाबत आदेश दिलेले असून, त्यामधील तरतुदीनुसार ज्या भूसंपादन प्रकरणी भूसंपादन ॲवार्ड जाहिर झालेले आहे. अशा भूसंपादन प्रकरणी टी.डीआर अनुज्ञेय होणार नाही. प्रस्तुत प्रकरणामध्ये दि.२३/०८/१९९० रोजीचा निवाडा जाहिर झालेला असल्याने, याकामी टीडीआर देता येणार नाही ही वस्तुस्थिती आहे. तद्नंतर मा.उच्च न्यायालयाने उपायुक्त यांचे ॲफेडेव्हीट (प्रतिज्ञापत्र) दाखल करणे संबधीच्या सूचना केल्या त्यानुसार उपायुक्त यांनी दि.०७/०५/२००९ रोजी प्रतिज्ञापत्र (दुसरे) दाखल करणेत आले आहे.

पहिले अपील दाखल करणेस अंदाजे २२१ दिवस विलंब झाला आहे. सदरचा विलंब हा मे.न्यायालयाच्या झालेल्या आदेशाची माहिती महापालिकेस वेळेत मिळाली नसल्याने झालेला आहे.

आदेशाची माहिती प्राप्त होताच महापालिकेचे कायदा सल्लागार यांचे अभिप्राय घेवून उपरोक्त अपील दाखल करण्यात आले आहे.

अपीलाच्या अनुषंगाने मे.उच्च न्यायालयाने जिल्हा न्यायालया सांगली यांनी दिलेला आदेश कायम ठेवून मूळ दाव्याची र.रु.२८,९२,१४७.४० त्यावरील होणारी दि.२५/०७/१९९५ पासून ९% व्याजाने र.रु.३७,३०,८६९/- अशी एकूण र.रु.६६,२३,०१६/- मात्र न्यायालयात म्हणून भरण्याचे मे.उच्च न्यायालयाने आदेश दिलेले आहेत. सदरची रक्कम एका टप्प्यात भरणे महापालिकेस शक्य होणार नसल्याने ती हप्त्याने भरणा करणेस सवलत मिळणेकामी मे.उच्च न्यायालयास विनंती करण्यात आली होती. सदरची विनंती न्यायालयाने मान्य केलेने दि.२७/०१/२०१० रोजी पहिला हप्ता रु.१०,००,०००/- भरणेत आला. उर्वरित रक्कम ५ हप्त्यामध्ये भरणेस सवलत दिली आहे. सदरचे हप्ते उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मा.आयुक्तसो यांचे मान्यतेने मे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठस्तर सांगली यांचे कोर्टात भरणेत आला असून, मे.न्यायालयाच्या आदेशानुसार प्रत्येक महिन्याचे १० तारखेपर्यंत एकूण ५ हप्त्यापैकी प्रथम हप्ता र.रु.११,२४,६०४/- मात्र दि.१०/०२/२०१० रोजी न्यायालयात भरणा करणेत आलेली आहे. त्यास कार्योत्तर मान्यता मिळणेकामी विषयांकीत प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.

प्रस्तुत विषयी महासभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार सदरचा प्रस्ताव महासभेच्या अवलोकनार्थ येणे क्रमप्राप्त होते. तथापि, सदरची बाब ही न्याय प्रविष्ठ असल्याने, याकामी प्रशासनाने प्रशासकीय स्तरावर निर्णय घेणे उचित होईल असे या सभेचे स्पष्ट मत आहे. सबब, सदरचा प्रस्ताव ही सभा परत पाठवित आहे.

सूचक :- दादासाहेब कांबळे

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

नगररचनाकार

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- १७/०४/२०१०

ठराव क्रमांक :- ०८

विषय क्रमांक :- ०८

सोबतचे उपायुक्त (नगरसचिव विभाग) यांचे दि.०८/०४/२०१० चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची सार्वत्रिक पंचवार्षिक निवडणूक सन २००८ मध्ये होवून नव्याने कौन्सिल अस्तित्वात आले. महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.७३ मधून नागरिकांचा मागासवर्ग या प्रवर्गातून श्री.साजिदअली बरकतअली पठाण हे निर्वाचित म्हणून घोषित करणेत आले होते. तथापि, सदर निवडणूकीमध्ये पराभूत उमेदवार श्री.इद्रिस अलियास नायकवडी यांनी सांगली येथील मे.जॉईट सिव्हिल जज्ज, सिनियर डिव्हिजन यांचे न्यायालयात इलेक्शन पिटीशन नं. २ /२००८ व ३/२००८ अन्वये दाखल करणेत आले होते. दाव्याचा निकाल विरुद्ध झालेने, श्री.पठाण यांनी मुंबई उच्च न्यायालय तसेच मा.सर्वोच्च न्यायालय,दिल्ली येथे अपील दाखल केले होते. सदरचे अपिल सर्वोच्च न्यायालयाने फेटाळले.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २०(२) मधील तरतुदीनुसार स्थायी समितीवर नियुक्ती केलेल्या १६ सदस्यापैकी निम्मे सदस्य उक्त अधिनियमातील कलम २०(३) अन्वये निवृत्त करणेत आले होते. त्यानुसार उक्त अधिनियमातील कलम २०(५) अन्वये आणि कलम ३१ अ मधील सुधारीत तरतुदीनुसार प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून, नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करणे या अधिनियमातील सुधारीत तरतुदीनुसार तौलनिक संख्याबळानुसार श्री.साजिदअली बरकतअली पठाण यांची भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या गटनेते यांनी शिफारशीत केलेनुसार श्री.पठाण यांची स्थायी समिती सदस्य म्हणून दि.१०/०९/२०१० रोजी महासभेने नियुक्तीस मान्यता दिली होती.

वरील सर्व वस्तुस्थिती आणि अधिनियमातील तरतुद विचारात घेतली असता, श्री.साजिदअली बरकतअली पठाण यांचे अपिल सर्वोच्च न्यायालयाने फेटाळल्याने,स्थायी समिती सदस्याची जागा रिक्त झालेने, उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार कलम २३ मध्ये निर्देशित केलेप्रमाणे आणि कलम २२ अन्वये अशी रिकामी झालेली जागा, ज्या मुदतीपर्यत पद धारण करण्याचा हक्क असता त्या मुदतीपर्यत सदस्य म्हणून पद धारण करील" त्यानुसार आणि कलम ३१ अ मधील सुधारीत तरतुदीनुसार प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून, नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करणे या अधिनियमातील सुधारीत तरतुदीनुसार तौलनिक संख्याबळानुसार श्री.साजिदअली बरकतअली पठाण यांचे स्थायी समिती सदस्य या रिक्त जागेवर भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे गटनेते यांनी केले शिफारशीनुसार श्री.कलगुटगी विशाल राजाराम यांची

नगरसचिव

स्थायी समिती सदस्य म्हणून उर्वरित कालावधीसाठी नियुक्ती करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सूचक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :-

महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- १७/०४/२०१०

ठराव क्रमांक :- ०९

विषय क्रमांक :- ०९

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.०९/०४/२०१० चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या सांगली शहराकरीता मोनोरेल प्रकल्प राबविणेकामी आणि प्रकल्पासाठी आवश्यक असणारा सिटी मोबिलिटी प्लॅन तयार करुन घेणेकामी आणि त्याचे निकषानुसार प्रस्तावित मोनोरेल प्रकल्प राबविणेबाबत निर्णय घेणेबाबत इकडून दिनांक १४/०९/२००९ चे पत्रान्वये कळविणेत आले होते. त्यास अनुसरुन सांगली शहराकरीता MUIDCL ने त्यांचे स्तरावर सूचनेनुसार मे.एल अॅन्ड टी रॅमबॉल कन्सल्टींग इंजिनिअर लि., या कंपनीची निवड केली असून सदर कंपनीचे सल्लागार यांची फी सर्व करासह र.रु.४४,२७,४४२/- मात्र दयावी लागणार असलेने, तसेच सल्लागार यांचेशी ट्रायपार्टी अॅग्रीमेंट करावे लागणार असून, त्यासाठी महासभेच्या मान्यतेची मागणी केली आहे. आणि मोनोरेल प्रकल्पाचा सुसाध्यता अहवाल मुख्यत: सिटी मोबिलीटी प्लॅनवर आधारित असल्याने, जर सदरचा प्रकल्प अहवाल सुसाध्य झाला तर, सदर फी ची रक्कम मोनोरेल प्रकल्पात अंर्तभूत करुन ती महापालिकेस परत मिळू शकते. परंतु, सदरचा प्रकल्प अहवाल सुसाध्य झाला नाही तर, फी रक्कम परत मिळणार नाही असे मा.व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलेपमेंट कंपनी लिमिटेड यांनी दिनांक १८/०३/२०१० चे पत्रान्वये याबाबत महापालिकेस लेखी कळविले आहे.

महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती विचारात घेवून याकामी मा.प्रधान सचिव यांचेशी समक्ष चर्चा करुन, सदरची फी पूर्णपणे माफ करणेबाबत विनंती केली असता, सचिव महोदयांनी सदरची फी ची रक्कम माफ न करता महापालिकेस कर्ज रुपाने विनाव्याज पद्धतीने ५ वर्षे मुदतीसाठी परत फेड करणेच्या अटीवर महाराष्ट्र अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी लिमिटेड यांचेकडून उपलब्ध होवू शकेल असे निर्देशित करण्यात आले. सदरची बाब धोरणात्मक असलेने, याकामी महासभेची मान्यता आवश्यक असलेने, सदरचा प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. त्याशी ही सभा सहमती दर्शवित असून, ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

१. मनपा स्तरावर राबविण्यात येणारा मोनोरेल प्रकल्पासाठी आवश्यकयतो सिटी मोबिलीटी प्लॅन तयार करणेसाठी सल्लागाराची सर्व करासह फी रुपये ४४,२७,४४२/- इतकी MUIDCL ला देणे तसेच या सल्लागाराचे नियुक्तीसाठी येणारा जाहिरातीचा खर्च देणे.
२. महानगरपालिका महाराष्ट्र अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलेपमेंट कंपनी लिमिटेड MUIDCL व सिटी मोबिलीटी प्लॅन तयार करणेसाठी नेमलेले सल्लगार यांचेमध्ये ट्रायपार्टी अॅग्रिमेंट तयार करणे.
३. मनपाची आर्थिक स्थिती पाहता बिनव्याजी कर्ज स्वरुपात फी ची र.रु.४४,२७,४४२/- मात्र MUIDCL यांचेकडे मागणी करणे.

प्रशासनाने विषयपत्रात प्रस्तावित केले नुसार आणि वरील प्रमाणे तीन कामगिऱ्या करुन घेणेकामी विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा धोरणात्मक मान्यता देत आहे.

शहर अभियंता सूचक :-

ठराव बहूमताने मंजुर

महापौर,

अनुमोदक :-

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.